महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २६ वा | दिनांक : १२/१०/२०२४ | वार : शनिवार

## ठाकरे गटाच्या महिला उमेदवाराबाबत वापरला आक्षेपार्ह शब्द, आमदार भरत गोगावलेंची जीभ घसरली



**महाड :** ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर कोकणात रायगड जिल्ह्यातील महाडचे आमदार भरत गोगावले यांनी वादग्रस्त विधान केलं आहे. महाविकास आघाडीच्या ठाकरे गटाच्या उमेदवार स्नेहल जगताप यांच्या बाबत बोलताना त्यांची जीभ घसरली आहे. सांगा तुम्हाला कोण पाहिजे, तुम्हाला काम करणारा भाऊ पाहिजे की *** बनवणारी बहीण पाहिजे, अशा शब्दात शिवसेनेच्या शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांनी विधान केल्यानंतर त्यांच्यावर टीका होत आहे.

स्नेहल जगताप यांच्याबद्दल बोलताना भरत गोगावलेंची जीभ घसरली

स्नेहल जगताप आणि भरत गोवालले यांचे राजकीय जुने वाद आहेत, मात्र आता विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अनेक राजकीय घडामोडींदरम्यान या वादाला मोठी धार आली आहे. मात्र महाडमध्ये एका कार्यक्रमादरम्यान त्यांनी स्नेहल जगताप यांच्याबद्दल बोलताना त्यांची जीभ घसरली असून या विधानानंतर त्यांच्यावर मोठी टीका केली जात आहे.

विधानसभा निवडणूक महाड विधानसभा मतदारसंघ

महाडच्या माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप या काँग्रेसचे नेते आणि माजी आमदार माणिकराव जगताप यांच्या सुकन्या आहेत. राज्यात मोठा राजकीय भूकंप झाला त्यावेळी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर काही दिवसांनी स्नेहल जगताप यांनी काँग्रेसमधून शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला होता. महाडचे आमदार भरत गोगावले यांना शह देण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी मोठी खेळी करत महाड विधानसभा मतदारसंघात स्नेहल जगताप यांना उमेदवारी दिली आहे. आमदार भरत गोगावले यांना शह देण्यासाठी स्नेहल जगताप यांनी मागील दोन ते अडीच वर्ष तयारी सुरू केली आहे.

दरम्यान, महाडचे आमदार भरत गोगावले यांच्याकडे अलीकडेच एसटी महामंडळाचं अध्यक्षपद देण्यात आलं आहे. महाडचे ते महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या काळात भरत गोगावले यांच्याकडे संघटनेची मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. भरत गोगावले सभागृहातील शिवसेनेचे गटनेते देखील होते. या पार्श्वभूमीवर त्यांनी अनेक विकासकामंही केली आहेत.

## भाजपा नेत्या नवनीत राणा यांना सामूहिक अत्याचाराची धमकी हैदराबादवरून आलं निनावी पत्र



**अमरावती :** माजी खासदार आणि भाजपा नेत्या नवनीत राणा यांना पत्राद्वारे सामूहिक अत्याचाराची धमकी देण्यात आली आहे. हे पत्र स्पीड पोस्टद्वारे त्यांच्या अमरावती येथील घरी प्राप्त झालं आहे. नवनीत राणा यांना मिळालेल्या धमकीच्या पत्रामुळे आता खळबळ उडाली आहे. तसेच या पत्रामुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चांनाही उधाण आलं आहे. नवनीन राणा यांचे स्वीय साहायक विनोद गुहे यांनी आज माध्यमांशी बोलताना यासंदर्भात माहिती दिली.

नेमकं काय म्हणाले विनोद गुहे?

"आज दुपारी आमदार रवी राणा आणि माजी खासदार नवनीत राणा यांच्या अमरावतीतील निवासस्थानी एक निनावी पत्र आलं आहे. हे पत्र लिहिणाऱ्या व्यक्तीने त्याचे नाव अमीर असल्याचे सांगितलं आहे. हैदराबादमधून त्याने हे पत्र पाठवलं असून त्याचे नातेवाईक दुबई आणि पाकिस्तानमध्ये असल्याचा उल्लेख त्याने या पत्रात केला" असल्याचे विनोद गुहे यांनी म्हटलं आहे.

"मी तुमच्यावर सामूहिक अत्याचार करेन"

पुढे बोलताना, "तुम्ही हिंदूंबाबत बोलता. हे योग्य नाही. मी तुमच्यावर सामूहिक अत्याचार करेन तसेच मला १० कोटी रुपये द्या अन्यथा मी तुमच्या घरासमोर गाय कापेन, अशी धमकीही त्याने दिल्याचेही विनोद गुहे यांनी सांगितलं आहे. या पत्रासंदर्भात राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली असून याप्रकरणी तत्काळ कारवाई करून पत्र पाठवण्याऱ्या व्यक्तीला अटक करावी", अशी मागणीही विनोद गुहे यांनी केली आहे.

धमकीचे पत्र हे इंग्रजी लिपीत

दरम्यान, माजी खासदार नवनीत राणा यांना पाठवलेले धमकीचे पत्र हे इंग्रजी लिपीत असून त्याचा मजकूर मात्र हिंदीमध्ये आहे. तसेच या पत्राच्या दोन्ही बाजूंनी हे पत्र लिहिण्यात आले आहे. हे पत्र ज्या पाकिटामधून पाठवण्यात आले, त्या पाकिटावर नवी दिल्ली येथील पत्त्यासह रवी राणा यांच्या शंकर नगर येथील घराचा पत्ता खाली बारीक अक्षरात इंग्रजीमध्ये लिहिला आहे.

नवनीत राणांना यापूर्वीही जीवे मारण्याची धमकी

महत्त्वाचे म्हणजे माजी खासदार नवनीत राणा यांना अशाप्रकारे धमकी देण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी मार्च महिन्यात नवनीत राणा यांना जिवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. त्यावेळी धमकी देणाऱ्याने व्हॉटसअॅपवर एक ध्वनिफित पाठवून ही धमकी दिली होती. या ध्वनिफितमध्ये त्यांनी शिविगाळदेखील करण्यात आली होती.




## टाटा मोटर्सच्या कामगारांना ४९ हजारांचा बोनस



**पिंपरी** : टाटा समूहाचे अध्यक्ष रतन टाटा यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होऊन २४ तास उलटत नाहीत, तोपर्यंतच टाटा मोटर्सच्या सर्व कामगारांच्या बँक खात्यावर दिवाळी बोनस जमा झाला आहे. टाटा परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असतानाच बोनस मिळाल्यामुळे कामगार वर्ग अधिकच भावनिक झाला. दुसरीकडे कंपनीच्या इतिहासातच प्रथमच खंडेनवमी साजरी झाली नाही. कामगारांनी रतन टाटा यांना श्रद्धांजली वाहिली.

ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांचे बुधवारी ( ९ ऑक्टोबर) रात्री निधन झाले. गुरूवारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. रतन टाटा यांच्या जाण्याने टाटा समूहासह सर्व कामगार वर्ग दुःखाच्या छायेत आहे. अंत्यविधीला अद्याप २४ तासही उलटले नाहीत. मात्र, दिवाळीचा सण अवघ्या १५ दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे कंपनी व्यवस्थापनाने जवळपास दहा हजार कामगारांच्या बँक खात्यात बोनस म्हणून प्रत्येकी ४९ हजार रूपये जमा केले आहेत. बोनस देत दुःखात असणाऱ्या सर्व कामगारांची दिवाळी गोड केली आहे. टाटा परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असतानाच बोनस मिळाल्यामुळे कामगार वर्ग अधिकच भावनिक झाला.

दुसरीकडे पिंपरीतील टाटा कंपनीच्या प्रकल्पात इतिहासात पहिल्यांदाच खंडेनवमीच्या पूजेत खंड पडला. प्रकल्पामध्येच सर्व कामगार एकत्र येत रतन टाटांना श्रद्धांजली वाहिली. शहरातील टाटा मोटर्स कंपनीत दहा हजार कायमस्वरूपी तर ३० हजार कंत्राटी असे ४० हजार कामगार कार्यरत आहेत. कायमस्वरूपी कामगारांना ४९ हजार रुपये तर कंत्राटी कामगारांना ठरलेल्या करारानुसार बोनस दिला आहे.

आमच्या दैवतावर अंत्यसंस्कार होऊन २४ तास होत नाही, तोपर्यंत कंपनी व्यवस्थापनाने सर्व कामगारांच्या खात्यावर दिवाळी बोनस जमा केला आहे. बोनस मिळाल्यानंतर कामगार अधिकच भावनिक झाले आहेत, असे टाटा मोटर्स युनियनचे अध्यक्ष शिशुपाल तोमर यांनी सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १२ ऑक्टोबर २०२४


## मला काय शिवीगाळ करायची ती करा, लोकांचे स्वप्न राखरांगोळी करू नका - अजित पवार



**नाशिक :** उपमुख्यमंत्री अजित पवार लाडकी बहीण योजनेवरून विरोधकांवर चांगलेच संतापल्याचे पहायला मिळाले. तुम्हाला मला काय शिवीगाळ करायची ती करा, मला भोकं पडत नाहीत. पण योजनेबाबत खोटे बोलून करोडो कुटुंबाचे स्वप्न राख रांगोळी करू नका, असा घणाघात त्यांनी केला. ते नाशिक दौऱ्यावर असताना एका मेळाव्यात बोलत होते.

आगामी विधानसभा निवडणु-कीच्या अनुषंगाने अजित पवार यांच्या हस्ते नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन आज करण्यात आले. यावेळी आयोजित एका मेळाव्यात त्यांनी लाडकी बहीण योजनेवर टीका करणाऱ्या विरोधकांवर निशाणा साधला. विरोधक लाडकी बहीण योजनेविरोधात कोर्टात गेले. तुम्हाला मला काय शिवीगाळ करायची ती करा, मला भोकं पडत नाही. पण योजनेबाबत खोटे बोलून करोडो कुटुंबांचे स्वप्नांची राख रांगोळी करू नका, अशी टीका अजित पवारांनी केली.

मला बदनाम करण्याचे काम सुरू आहे

अजित पवार यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले. बस तिकिटात महिलांना टक्के सूट आहे. त्यांना जाऊ द्या, पुरुष गेला की गप्पा मारत बसतो. याला तिकीट मिळेल का? हरियाणात काय झाले? तुम्हाला काय करायचे आहे. तुम्ही तुमचा प्रपंच बघा. जो गप्पा मारतो, त्याच्या शेतात काँग्रेस आणि गाजर गवत वाढलेले दिसले, असा टोला पवारांनी विरोधकांना लगावला. मला बदनाम करण्याचे काम सुरू असून मी त्याकडे लक्ष देत नाही, असेही अजित पवार म्हणाले.

विरोधकांना संधी द्यायची नाही

अजित पवार लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना म्हणाले, माझ्या माय माऊलींनी मला दिलेले प्रेम मी कधीही विसरू शकणार नाही. तुम्हाला लाभ आणि लाभातून बळ देणार आहोत. मी जोपर्यंत आहे तोपर्यंत तुमच्या पाठिशी उभा राहणार आहे. मी शब्दाचा पक्का आहे. लाडकी बहीण योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. मात्र तरीही विरोधक भ्रम पसरवत असून चुनावी जुमला असल्याचे म्हणत आहेत. पैसे परत घेतील असेही विरोधक म्हणत होते. पण पैसे येत आहेत की नाही? बहिणींना रक्षाबंधनानिमित्त दिलेली ओवाळणी कोणी मागे घेतो का रे? असा सवाल अजित पवारांनी विचारला.

महायुतीचे सरकार आले की पुन्हा पाच वर्ष योजना सुरू करणार आहोत. मतदानावेळी तुम्ही कोणते बटन दाबता यावर तुमची योजना चालू राहणार की नाही हे ठरणार आहे. त्यामुळे विरोधकांना संधी द्यायची नाही, असेही पवार म्हणाले.

## २ अग्नीवीर जवानांचा प्रशिक्षणादरम्यान मृत्यू

### तोफेचा बॉम्बगोळा फुटल्यानंतर अपघात, एक जण जखमी, नाशिकमधील घटना



**नाशिक :** नाशिकमध्ये भारतीय सैन्यातील दोन अग्नीवीरांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. आर्टिलरी सेंटरमध्ये स्फोट झाल्याने दोन अग्निवीरांचा मृत्यू झाला आहे. सरावावेळी फायरिंग करत असताना स्फोट झाल्याने अग्निवीरांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. या घटनेमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार तोफेचा गोळा लोड करत असताना ब्लास्ट झाला. यामध्ये अग्नीवीर गोहिल सिंग (वय २०) आणि सैफत शित (वय २१) गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने देवळाली येथील सैनिकी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले.

नेमके काय घडले?

नाशिक शहरात देवळाली कॅम्प येथे स्कुल ऑफ आर्टिलरी चे शिंगवेबहुला फायरिंग रेंज आहे. अग्निवीर नाशिकरोड तोफखाना केंद्रात भरती होऊन तेथे त्यांचे लष्करी प्रशिक्षण सुरू आहे. गुरुवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास अग्निविरांची एक तुकडी शिंगवे बहुलाला फायरिंग रेंज या ठिकाणी तोफेचा सराव करण्यासाठी गेलेली होती. यावेळी इंडियन फिल्ड गन क्र-४ मधून अग्निवीरांच्या चमूने बॉम्बगोळा फायर केला असता त्याचा तोफेजवळ स्फोट झाला. यात ३ जण जखमी झाले. यातील दोघांचा मृत्यू झाला असून एकावर उपचार सुरू आहेत.

१४ जून २०२२ रोजी सादर झाली होती अग्निवीर योजना

अग्निपथ योजना गतवर्षी १४ जून रोजी सादर झाली होती. या योजनेंतर्गत सशस्त्र दलांत तरुणांची भरती करण्यासाठी नवे नियम जारी करण्यात आले होते. या नियमांनुसार, साडे १७ ते २१ वर्षांपर्यंतचे तरुण या योजनेसाठी पात्र होते. त्यांना ४ वर्षांसाठी भरती केले जाणार आहे. सरकारने हे पाऊल वेतन व पेंशनचे बजेट कमी करण्यासाठी उचलले होते.

भरती केलेल्या तरुणांपैकी २५% तरुणांना नियमित सेवेची संधी मिळेल. केंद्राच्या या योजनेला देशभरातील तरुणांनी विरोध केला होता. या प्रकरणी अनेक ठिकाणी निदर्शनेही झाली. हे पाहून सरकारने भरती होण्याचे वय २१ वरून २३ वर्षे केले.

## नाशिकमध्ये अबू सालेमच्या प्रेयसीसह केनियन नागरिक एटीएसकडून ताब्यात

**नाशिक :** मुंबई साखळी बॉम्बस्फोटातील आरोपी गँगस्टर अबू सालेमला गुरुवारी (दि. १०) नाशिकरोड कारागृहात भेटण्यासाठी आलेल्या केनियन नागरिकासह सालेमची प्रेयसी हिनाला एटीएसने तब्बल १० तास चौकशीनंतर ताब्यात घेतले. दरम्यान, सालेमची प्रेयसी सर्व कागदपत्रांची कायदेशीर पूर्तता करून भेटण्यासाठी आली होती. मात्र, परदेशी नागरिकाकडे कुठलीही कायदेशीर कागदपत्रे आढळली नसून पोलिस दोघांचीही कसून चौकशी करत आहेत.

सालेमला विदेशातून भारतात आणून त्याच्याविरोधात मुंबई साखळी बॉम्बस्फोटाचा खटला चालवण्यात आला. २०१७ पासून तो कारागृहात असून त्यास न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. गेल्या सहा महिन्यांपूर्वी सुरक्षिततेच्या कारणास्तव सालेमला मुंबईतील आर्थर रोड कारागृहातून नाशिक कारागृहात हलवण्यात आले. त्याच्या सुरक्षिततेसाठी विशेष पोलिस पथक तैनात आहे. गुरुवारी हिनाने सालेमची भेट घेतली. याच वेळी केनियन नागरिक माजिद चतूर (६५) देखील बंदिवान संतोष आंबेकर यास भेटण्यास आंबेकरच्या मुलासोबत आला होता. आंबेकरची भेट घेतल्यानंतर त्याने सालेमची भेट घेतल्याचा संशय पथकाला असल्याने या दोघांना चौकशीकरिता ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर त्यांची चौकशी करण्यात आली.

कोण आहे माजिद चतूर?

माजिद चतूर हा केनियचा नागरिक आहे. तिथे त्याचा हा◌ॅटेल आणि लँड डेव्हलपिंगचा व्यवसाय आहे. त्याची पहिली पत्नी माया हिचे निधन झाल्याने त्याने नेपाळची रहिवासी सीतासोबत लग्न केले आहे. तो पत्नी सीता आणि मित्र सुलेमान खोया याच्यासोबत भारतात टुरिस्ट व्हिसावर फिरण्यासाठी आला आहे. दोन दिवसांपासून तो महामार्गावरील एका हॉटेलमध्ये मुक्कामी आहे. मागील महिन्यात अबू सालेमला पोलिसांनी दिल्ली कोर्टात हजर केले होते. मात्र, कोर्टाने पुढच्या सुनावणीची तारीख १० सप्टेंबर दिली होती. त्यामुळे अबू सालेमला दिल्लीहून नाशिकला सेंट्रल जेलमध्ये आणले होते. यासाठी कर्नाटक एक्स्प्रेसने अबू सालेमला दिल्लीहून मनमाडला आणले होते.

सालेमला भेटला की आंबेकरला भेटीचे गूढ

माजिद चतूर हा खरोखर आंबेकरला भेटण्यास आला होता की सालेमला याचे गूढ वाढले आहे. आंबेकर हादेखील काही वर्षांपासून कारागृहात आहे. इतके दिवस आंबेकरला भेटण्यास का आला नाही. तसेच सालेम कारागृहात असताना चतूर कसा आला असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

सालेमला ३० वर्षांपूर्वी भेटल्याचा केला दावा

संशयित चतूर याने एटीएसला दिलेल्या जबाबात तो कारागृहातील संतोष आंबेकर यास भेटण्यासाठी त्याचा मुलगा संजित आंबेकरसोबत आला होता. आंबेकर याच्या जामिनासाठी भेट घेतली होती. सालेमला ३० वर्षांपूर्वी केनियामध्ये कॅसिनोत पाहिले असल्याचे आठवत असल्याचा चतूरने जबाबात सांगितले.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903


## नोएल टाटा यांची टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी निवड

### 'ट्रेंट - व्होल्टास'चे प्रमुख नोएल हे रतन टाटा यांचे सावत्र बंधू, ट्रस्टने सर्वानुमते घेतला निर्णय



**मुंबई :**टाटा ट्रस्टने दिवंगत उद्योगपती रतन टाटा यांचे उत्तराधिकारी म्हणून नोएल टाटा यांच्या नावावर शिक्कामोर्तब केला आहे. नोएल टाटा हे रतन टाटा यांचे सावत्र बंधू आहेत. रतन यांच्या निधनानंतर ते या पदासाठी एकमेव दावेदार होते. त्यांचे बंधू जिम्मी यांचेही नाव चर्चेत होते. पण ते यापूर्वीच रिटायर झालेत. त्यामुळे बोर्डाने नोएल यांच्या नावावर एकमताने शिक्कामोर्तब केले.

सुप्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांचे बुधवारी रात्री निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी कुणाची निवड होणार? हा प्रश्न ऐरणीवर आला होता. अखेर या प्रश्नाचे उत्तर मिळाले आहे. टाटा ट्रस्टने शुक्रवारी बोलावलेल्या एका बैठकीत नवे अध्यक्ष म्हणून नोएल टाटा यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. नोएल टाटा हे सर दोराबजी टाटा ट्रस्ट व टाटा ट्रस्टमधील एक विश्वस्त आहेत. त्यांची कार्यशैली रतन टाटा यांच्याहून फार वेगळी आहे. त्यांना प्रसिद्धीपासून दूर राहून काम करणे आवडते.

टाटा ट्रस्टने एका अधिकृत निवेदनात म्हटले की, 'नोएल टाटा यांची नियुक्ती तत्काळ प्रभावाने लागू होईल.'

नोएल टाटा म्हणाले- माझ्या सहकारी विश्वस्तांनी मला दिलेल्या या जबाबदारीमुळे माझ्या मनात अत्यंत सन्मानित व विनम्रतेची भावना निर्माण झाली आहे. मी श्री रतन टाटा आणि टाटा समूहाच्या संस्थापकांचा वारसा पुढे नेण्यासाठी उत्सुक आहे. एका शतकाहून अधिक काळापूर्वी स्थापन झालेला टाटा ट्रस्ट सामाजिक कार्यांचे एक अद्वितीय माध्यम आहे. या प्रसंगी आम्ही आमची विकास व जनहिताची कामे पुढे नेण्यासाठी व राष्ट्र निर्माणातील आपली भूमिका बजावण्यासाठी पुन्हा एकदा स्वतःला समर्पित करत आहोत.

नोएल यांचीच निवड का... ५ कारणे

एक - टाटा समूहाशी निगडित असलेल्या पारशी समुदायाचे म्हणणे होते की, अध्यक्ष हा टाटा यांच्या नावाशी संबंधित कोणीतरी असावा. त्यामुळे नोएल यांची एकमताने निवड झाली.

दोन - नोएल ४० वर्षांहून अधिक काळ टाटा समूहाशी संबंधित आहेत. नोएल टाटा हे सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि सर रतन टाटा ट्रस्टचे विश्वस्त आहेत. टाटा सन्समध्ये या ट्रस्टचे बहुसंख्य शेअर्स आहेत. टाटा समूहाशी प्रदिर्घ संबंध आणि या ट्रस्टमधील त्यांच्या भूमिकेमुळे नोएल अध्यक्षपदाच्या शर्यतीत आघाडीवर होते.

तीन - नोएल हे २०१४ पासून ट्रेंट लिमिटेडचे अध्यक्ष आहेत. ट्रेंट ही ज्युडिओ आणि वेस्टसाइडची ओनर आहे. त्यांच्या नेतृत्वात मागील १० वर्षांत कंपनीच्या शेअर्समध्ये ६०००% पेक्षा अधिक वाढ झाली आहे.

चार - बोर्डाने रतन टाटा यांच्या अंत्यसंस्कारानंतर दुसऱ्याच दिवशी झालेल्या बैठकीत त्यांना श्रद्धांजली वाहिली. तसेच ट्रस्टच्या अध्यक्षपदाचा निर्णय घेतला. हा निर्णय रतन टाटा यांच्याच पुढे जात राहा या तत्वज्ञानावर घेण्यात आला. म्हणजे लीडरशिपमध्ये कोणताही अडथळा आला नाही पाहिजे.

पाच - नोएल यांना या जबाबदारीसाठी गत काही काळापासून तयार केले जात होते.

नवल टाटा यांच्या दुसऱ्या पत्नीचे सुपुत्र

नोएल हे नवल टाटा यांच्या दुसऱ्या पत्नी सिमोन यांचे सुपुत्र आहेत. तर रतन टाटा व जिम्मी टाटा नवल व त्यांच्या पहिल्या पत्नी सूनी यांचे सुपुत्र आहेत.

नोएल यांनी ससेक्स विद्यापीठात शिक्षण घेतले. त्यांनी आपल्या करिअरची सुरुवात टाटा इंटरनॅशनलमधून केली. १९९९ मध्ये, त्यांना ट्रेंट, समूहाची रिटेल शाखा ट्रेंटचे व्यवस्थापकीय संचालक झाले. या कंपनीची सुरुवात त्यांच्या मातोश्री सिमोन यांनी केली होती.

२०१०-११ मध्ये नोएल यांना टाटा इंटरनॅशनलचे अध्यक्ष बनवण्यात आले. यानंतर त्यांना समूहाचे अध्यक्ष बनवण्याची चर्चा सुरू झाली. मधल्या काळात सायरस मिस्त्री यांनी टाटा समूहाच्या अध्यक्ष पदावर दावा केला. त्यानंतर सायरस मिस्त्री यांना टाटा सन्सच्या अध्यक्षपदावरून हटवण्यात आले. रतन टाटा यांनी स्वतः समूहाची जबाबदारी स्वीकारली. २०१८ मध्ये, नोएल यांना टायटनचे उपाध्यक्ष बनवण्यात आले. तत्पूर्वी, २०१७ मध्ये, त्यांना ट्रस्टच्या मंडळावर सामावून घेण्यात आले.

₹१३.८ लाख कोटींच्या समूहात टाटा ट्रस्टचा वाटा ६६%

टाटा ट्रस्ट ही टाटा समूहाच्या धर्मादाय संस्थांचा एक समूह आहे. सुमारे १३ लाख कोटींच्या महसूलासह त्याचा टाटा समूहात तब्बल ६६% वाटा आहे. टाटा ट्रस्टमध्ये सर रतन टाटा ट्रस्ट व अलाइड ट्रस्ट आणि सर दोराबजी टाटा ट्रस्ट व अलाइड ट्रस्टचा समावेश आहे. दारिद्र्य निर्मुलन, आरोग्य सेवा व शिक्षणावर लक्ष केंद्रीत करणारा हा ट्रस्ट रतन टाटा यांच्या वारशाचा अभिन्न अंग आहे.

२०१४ मध्ये झाले होते ट्रेंटचे अध्यक्ष, शेअर्स ६०००% ने वाढले

नोएल टाटा २०१४ पासून ट्रेंट लिमिटेडचे अध्यक्ष आहेत. ते ट्रेंट ज्युडिओ व वेस्टसाइडचेही ओनर आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली, गेल्या १० वर्षांत कंपनीचे शेअर्स ६,०००% पेक्षा जास्त वाढलेत. नोएल यांच्या नेतृत्त्वात कंपनीने अशा वेळी आपल्या कर्मचारी व स्टोअर्सची संख्या वाढवली, जेव्हा तिचे मार्केट पीयर्स कमी होत होते.

नोएल, एक आयरिश नागरीक, त्यांना ३ मुले

६७ वर्षीय नोएल टाटा, हे रतन टाटा यांचे सावत्र बंधू आहेत. गत अनेक वर्षांपासून ते टाटा ट्रस्टसह टाटा समूहाशी संबंधित आहेत. ते नवल टाटा यांच्या दुसऱ्या पत्नीचे सुपुत्र आहेत. नोएल, एक आयरिश नागरीक आहेत. त्यांनी आलू मिस्त्री यांच्याशी विवाह केला. आलू या टाटा सन्समधील सर्वात मोठे शेअरधारक असणाऱ्या पलोनजी मिस्त्री यांच्या कन्या आहेत.

नोएल टाटा यांना लिआ, माया व नेव्हिल ही ३ मुले आहेत. टाटा ट्रस्टच्या वेबसाइटनुसार, त्यांची मुलेही कुटुंबाशी संबंधित काही सेवाभावी संस्थांचे विश्वस्त आहेत. नोएल टाटा आपल्या लो-प्रॉफिट लीडरशिप स्टाइलमुळे ओळखले जातात. रतन टाटा यांच्या तुलनेत ते मीडियापासून दूर राहणे पसंत करतात.

रतन टाटांनी सुप्रीम कोर्टातील सुनावणीत उत्तराधिकाऱ्याविषयी नोंदवले होते मत

उल्लेखनीय बाब म्हणजे रतन टाटा यांनी आपल्या उत्तराधिकाऱ्याविषयी सुप्रीम कोर्टात एका सुनावणीत स्पष्ट मत नोंदवले होते. सध्या मी या ट्रस्टचा अध्यक्ष आहे. पण भविष्यात दुसरी एखादी व्यक्ती माझ्या जागी असेल. त्याचे नाव टाटा हेच असावे हे गरजेचे नाही. एका व्यक्तीचे आयुष्य फार मर्यादित असते. पण संघटना नेहमीच कार्यरत असते, असे ते म्हणाले होते.

उल्लेखनीय बाब म्हणजे रतन टाटा हे टाटा ट्रस्ट व टाटा सन्सचे अध्यक्षपद एकाचवेळी सांभाळत होते. ही दोन्ही पदे सांभाळणारे ते एकमेव व्यक्ती होते. त्यानंतर २०२२ मध्ये टाटा सन्सच्या संचालक मंडळाने सर्वानुमते त्यांच्या आर्टिकल ऑफ असोसिएशनमध्ये एक सुधारणा केली होती. त्यानुसार एकच व्यक्ती या दोन्ही पदांवर राहणार नाही अशी तरतूद करण्यात आली होती. उद्योगपती सायरस मिस्त्री यांच्यासोबतच्या कायदेशीर लढाईमुळे हा निर्णय घेण्यात आला होता.

स्वतःच्या उत्तराधिकाऱ्याविषयी रतन टाटांना काय वाटत होते?

रतन टाटा यांनी यांनी आपल्या टाटायन नामक पुस्तकातून आपल्या उत्तराधिकाऱ्याविषयी मत व्यक्त केले होते. आपला उत्तराधिकारी द्रष्टा हवा. त्याच्याकडे भविष्यवेधी नजर हवी. किमान पुढील २-३ शतके त्याला समूहाचे नेतृत्व करता यावे अशा वयाचा तो असावा. विशेषतः आपल्या उत्तराधिकाऱ्याला अहंभाव नसावा. कारण एक व्यक्ती म्हणून एवढ्या मोठ्या व्यवसायाचा प्रमुख म्हणून त्याच्या अहंकार उत्पन्न होण्याची शक्यता असते. त्यामुळे आपल्या संभाव्य उत्तराधिकाऱ्याकडे असा दुर्गुन नसावा, असे रतन टाटा यांना वाटत होते. यावरून रतन टाटा यांना आपला उत्तराधिकारी केवळ नेमायचा म्हणून नेमण्यात कोणताही रस नव्हता हे स्पष्ट होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १२ ऑक्टोबर २०२४

## पीएम किसान व लाडकी बहीण योजनेचे पैसे काढण्यासाठी औराळा गावच्या मध्यवर्ती बँकेत गर्दी



**कन्नड (अक्षय चव्हाण) :** लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा केलेल्या अनुदानाची रक्कम काढण्यासाठी शेतकरी सोमवारपासून बँकेत गर्दी करता आहेत. त्यामुळे नियोजन करतांना बैंक कर्मचाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडते आहे. ऐन दसरा आणि दिवाळीच्या तोंडावर राज्य शासनाने नुकतीच मुखामंत्री लाडकी बहीण योजना, पी.एम. किसान योजना, अतिवृष्टीतील पिकांच्या नुकसानीपोटीचे अनुदान, पीक विमा आदी विविध योजनांचे पैसे लाभाष्यांच्या खात्यात जमा केले आहेत. हे पैसे काढण्यासाठी महिला व वृद्ध व्यक्ती याची फजिती होत आहे

## नवरात्र उत्सवानिमित्त चिंचोली येथे ह.भ.प शिवलीला ताई पाटील यांच्या अमृतवाणीतून किर्तन संपन्न





**कन्नड (अक्षय चव्हाण) :** चिंचोली येथील श्री जगदंब देवी नवरात्र उत्सव समिती यांच्यासह किर्तन व कला महोत्सवाचे आयोजन केले होते. गुरुवारी ह.भ.प शिवलीला ताई पाटील यांच्या अमृतवाणीतून किर्तन संपन्न झाले. याप्रसंगी कन्नड सोयगाव विधानसभा मतदारसंघाच्या संघर्षकन्या सौ. संजनाताई जाधव यांनी किर्तनाला उपस्थित राहून कीर्तनाचा आनंद घेतला. किर्तन ऐकण्यासाठी गावातील व पंचक्रोशीतील नागरिक यांची मोठ्या संख्येने यावेळी उपस्थिती होती.

## मारेगावमध्ये व्यापारी गरबा उत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मारेगाव** नवरात्रीच्या पावन सोहळ्यात मारेगाव शहरात व्यापारी महिला मंडळाच्या वतीने आयोजित गरबा उत्सवाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. निशुल्क प्रवेशामुळे शहरातील नागरिकांमध्ये मोठा उत्साह असून, गरबाला शेकडो नागरिक आपली उपस्थिती लावत आहे.

मारेगाव शहरात अनेक वर्षापासून व्यापारी महिला मंडळाच्या वतीने नवरात्रात गरबा दांडियाचे आयोजन केले जाते. या नवरात्री उत्सवाच्या निमित्त मारेगाव शहरात उत्साहाचे वातावरण आहे. येथे आयोजित व्यापारी गरबा महोत्सवात नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला आहे. सिडाणा येथील खुल्या प्रांगणात आयोजित या उत्सवात नागरिकांनी पारंपरिक वेशभूषेत सजून, गरबा रातभर नाचत आहेत. महिला मंडळाच्या सदस्यांनी ग्रामीण भागातील महिलांना पंधरा दिवस निशुल्क गरबा प्रशिक्षण देऊन उत्सवात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले आहे. यामुळे ग्रामीण भागातूनही मोठ्या संख्येने महिला गरबा खेळण्यासाठी दाखल झाल्या आहेत. महिला मंडळाच्या भाग्यश्री गिरीश मेहता, सुरभी सुमित जयस्वाल, खुशबू पियुष व्यास यांच्यासारख्या महिलांच्या प्रयत्नांमुळे हा उत्सव शहरातील एक प्रमुख आकर्षण बनले आहे. या उत्सवामुळे मारेगावकरांमध्ये एकता आणि सद्भावना वाढण्यास मदत झाली आहे.

# सयाजी शिंदेंचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश

### विधानसभा निवडणुकीत स्टार प्रचारकाची जबाबदारी; म्हणाले- धोरणे आवडल्याने राष्ट्रवादीत आलो



**मुंबई :** अभिनेते सयाजी शिंदे यांनी शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. मुंबईत आयोजित एका पत्रकार परिषदेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्ष प्रवेश सोहळा संपन्न झाला. यावेळी प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ व सुनील तटकरे यांच्यासह इतर मान्यवरांची उपस्थिती होती. येत्या विधानसभा निवडणुकीत ते पक्षाचे स्टार प्रचारक असतील असे अजित पवार यांनी यावेळी सांगितले. तर पक्षाची धोरणे आवडल्यानेच राष्ट्रवादीत येण्याचा निर्णय घेतला असे सयाजी शिंदे यावेळी म्हणाले.

सयाजीरावांचे पक्षात स्वागत - अजित पवार

सयाजी शिंदेंच्या पक्ष प्रवेशाच्या वेळी अजित पवार म्हणाले की, मी जास्त चित्रपट पाहत नाही. सजाजीरावांचे काही चित्रपट मी बघितलेत. महाराष्ट्रातल्या कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही क्षेत्रात नाव कमावले तर त्याचा मला आनंद होतो. अनेक सामाजिक उपक्रमांचे नेतृत्व त्यांनी केले आहे. सयाजीरावांना झाडांची अतिशय आवड आहे. आपले डोंगर बोडखे होत चालले आहेत. तिथे सह्याद्री देवराईच्या माध्यमातून वृक्षारोपणाचे काम ते करतात. राज्यातील सिद्धिविनायक किंवा शिर्डी सारख्या मंदिरांत जर रोपटे हे प्रसाद म्हणून दिले तर लोक त्याला जिवापाड जपतील अशी सूचना त्यांनी केली. सयाजी शिंदे यांना विधानसभेत पक्षाच्या स्टार प्रचारकाची जबाबदारी देणार. पक्षात त्यांचा योग्य तो सन्मान केला जाईल. विजयादशमीच्या पूर्वसंध्येला त्यांचा प्रवेश होत आहे. ही एक चांगली गोष्ट आहे. आपण सर्व एकत्र येऊन एक नवा अध्याय लिहित आहोत. सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची राष्ट्रवादीची भूमिका आहे. शिव-शाहू-फुले-आंबेडकरांची आपली विचारधारा आहे. तीच पुढे नेण्याची आपली भूमिका आहे. सयाजी शिंदे यांचे मी पक्षात स्वागत करतो. नजिकच्या काळात असेच मान्यवर आपल्याला राष्ट्रवादीत येताना दिसतील.

ठरवलं नव्हतं राजकारणात येईन - सयाजी शिंदे

सयाजी शिंदे यावेळी म्हणाले की, मी राजकारणात येईन असं कधी वाटलंच नव्हतं. मात्र बऱ्याच गोष्टी करताना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी मंत्रालयात दादांशी भेट व्हायची. त्यातून दादांच्या धडाडीने निर्णय घेण्याच्या स्वभावाचा अनुभव आला. अलिकडच्या आठ दिवसांत ठरलं की राजकारणात का यायचं नाही. कारण बाहेर राहून बोलण्याऐवजी सिस्टिममध्ये जाऊनच प्रश्न सोडवले पाहिजे असा निर्णय घेतला. पक्षाची धोरणे व निर्णय आवडले, म्हणून राष्ट्रवादीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.

## माजी खासदार नवनीत राणा यांचा विरोधकांना टोला - रवी राणा यांचा पाना सर्व नटबोल्ट कसणार

**अमरावती** माजी खासदार नवनीत राणा यांनी शुक्रवारी पुन्हा एकदा विरोधकांच्या महाविकास आघाडीवर निशाणा साधला. रवी राणा यांचा पाना सर्व विरोधकांचे नटबोल्ट कसण्यासाठी तयार आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत बडनेरा येथून ते पुन्हा एकदा विधानसभेवर पोहोचतील, असे त्यांनी म्हटले आहे.

रवी व नवनीत राणा यांनी शुक्रवारी यांनी अंबादेवी मंदिरात अनवाणी पायी जात दर्शन घेतले. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधत नवनीत राणा यांनी विरोधकांवर निशाणा साधला. त्या म्हणाल्या, मी राज्यभरात भाजपचा प्रचार करणार आहे. मी भविष्यात लोकसभा किंवा राज्यसभेत प्रतिनिधित्व करावे अशी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची इच्छा आहे. यावरून विरोधकांनी आकांडतांडव करण्याची गरज नाही. पण जिल्ह्यातील बहुतांश जागा कमळ चिन्हावर लढल्या जाव्यात यासाठी माझे प्रयत्न सुरू आहेत.

जिल्ह्याबाहेर राहणाऱ्यांना जिल्ह्यातील स्थितीची जाणीव नाही. ते उगीचच टीका करत आहेत. पण आता रवी राणा यांचा पाना (स्वाभिमान पक्षाचे निवडणूक चिन्ह) सर्व विरोधकांचे नटबोल्ट कसणार आहे. ते बडनेरा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार म्हणून सलग चौथ्यांदा निवडून येतील असा मला ठाम विश्वास आहे.

महायुतीकडे ४ जागांची मागणी

आमदार रवी राणा यांनी यावेळी आपण महायुतीकडे ४ जागांची मागणी केल्याचे सांगितले. ते म्हणाले, नवनीत राणा या भाजपच्या नेत्या आहेत. त्यामुळे त्यांनी जिल्ह्यातील बहुतांश जागांवर कमळ चिन्ह असावे अशी इच्छा व्यक्त केली. पण आम्ही बडनेरा, दर्यापूर, मेळघाट आणि अचलपूर या चार जागा महायुतीकडे मागितल्या आहेत. युवा स्वाभिमान पक्षाने या जागा लढण्याची तयारी केली आहे.

नवनीत राणा या संपूर्ण जिल्ह्यात भाजपच्या प्रचारासाठी फिरत आहेत. त्या विधानसभेच्या मैदानात उतरणार नाहीत. त्या फक्त भाजपचा प्रचार करतील. भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी त्यांना राज्यसभेचा शब्द दिला आहे. राज्यसभा हेच त्यांच्यासाठी योग्य सभागृह आहे, असे रवी राणा म्हणाले.

## साखरखेर्डा येथील भाविकांची श्रद्धा असलेली प्राचीन गुप्तेश्वरी माता : मंदिराला लाभले निसर्गरम्य वातावरण, नवनात्रानिमित्त गर्दी

**साखरखेर्डा :** सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा या ऐतिहासिक गावाच्या दक्षिणेस अडीच किलोमीटर अंतरावर गुंजमाथा शिवारात गुप्तेश्वरी माता देवीचे मंदिर असून परिसरात असलेले हे देवीचे जागृत स्थान आहे. परिसरातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या आदिशक्ती गुप्तेश्वरी मातेच्या दर्शनासाठी नवरात्रात भाविकांची गर्दी होत आहे. पूर्वी या ठिकाणी गुंजमाथा नावाचे गाव अस्तित्वात होते. हे गाव माथ्यावर असल्याने या गावाला गुंजमाथा असे संबोधले जात होते. परंतु काळाच्या ओघात हे गाव नष्ट झाले. साखरखेर्डा येथील सुधाकर देशपांडे घराण्याची जमीन या ठिकाणी असून या जमिनीत १२ फूट खोलीच्या अंतरावर देवी प्रकट होऊन गुप्त झाली होती. त्यामुळे गुंजमाता देवीला श्री गुतेश्वरी देवी असेही संबोधल्या जाते. पूर्वी हे मंदिर हेमाडपंती होते. त्यानंतर सन १९६० मध्ये मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. या मंदिरातील गाभाऱ्यामध्ये अडीच फूट उंच काळ्या पाषाणाची आकर्षक अशी श्री गुंजमाता देवीची मूर्ती स्थानापन्न आहे. या मूर्तीला शेंदूर चढवला जातो. मंदिराच्या प्रवेशद्वारावर श्री गुप्तेश्वरी प्रसन्न असे कोरीव अक्षरात लिहिलेले निदर्शनास येते. मंदिराच्या आतील भिंतीवर श्री सरस्वती देवी असा उल्लेख आढळतो, मंदिराचा गाभारा १२ फूट खोल असल्याने मंदिरात प्रवेश करण्यासाठी उतरत्या पायऱ्या आहेत. श्री गुंजमाता देवीचे मुख पूर्व दिशेला असून मंदिरासमोर पंचवीस फूट अंतरावर पश्चिम मुखी गदाधारी उभी चार फूट उंचीची हनुमंताची आकर्षक पाषाणाची मूर्ती चबुतऱ्यावर स्थानापन्न आहे. पूर्वी ही मूर्ती काही अंतरावर होती. नंतर तिची प्राणप्रतिष्ठा मंदिरासमोर करण्यात आली. उजव्या बाजूला श्री महादेव, नंदीची काळ्या पाषाणाची मूर्ती कमी उंचीच्या टेकडीवर विराजमान आहे. मंदिराच्या आजुबाजुला संपूर्ण शेत परिसर असून निसर्गरम्य वातावरण आहे. नवरात्रोत्सवात भाविक पायी चालून श्री गुंजमाता देवीचे दर्शन करून आपल्यासोबत आणलेल्या दशम्या प्रसाद स्वरुपात ग्रहण करतात. मंदिराजवळ कुंड असून त्यामध्ये पाणी आहे. तर पौराणिक काळातील शिळा कायम आहे. चैत्र पौर्णिमेला येथे उत्सव साजरा करण्यात येतो. मंदिरात पुजारी म्हणून लक्ष्मणराव अंबासकर हे मागील सत्तर वर्षांपासून सेवा देत आहेत. नवरात्रोत्सवात येथे भाविकांची दर्शनासाठी गर्दी होत आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार १२ ऑक्टोबर २०२४


## लोककला महोत्सव :४५० बालकलावंतांकडून स्थानिक लोककलेचा जागर, बालरंगभूमी परिषदेने राबवला उपक्रम



**नंदुरबार :** जिल्ह्याचा लोककला महोत्सव ७ ऑक्टोबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात जल्लोषात पार पडला. महोत्सवाचे उद्घाटन आदिवासी संस्कृतीचे पारंपरिक वाद्य ढोल वादन व शिबली फिरवून करण्यात आले. महोत्सवात सुमारे ३५ शाळेतील ४५० बालकलावंत सहभागी झाले. लोकनृत्य, समूह लोकगीत, एकल नृत्य, एकल गीत, एकल गायन यांचे सादरीकरण करण्यात आले. विजेत्या संघाना व बालकलावंतांना सर्वोत्कृष्ट, उत्कृष्ट, उत्तम व प्रशंसनीय असे ७५ हजारांची बक्षिसे व सर्व सहभागी बाल कलावंतांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले.

या महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती मुंबईचे कार्याध्यक्ष राजीव तुलालवार, शिक्षणाधिकारी (प्राथ.) वंदना वळवी, उपशिक्षणाधिकारी (माध्य.) डॉ.युनूस पठाण, बालरंगभूमी परिषदेचे राज्य कार्यकारी सदस्य नागसेन पेंढारकर, जिल्हा शाखाध्यक्ष राजेश जाधव उपस्थित होते. बालरंगभूमी परिषदेने लोककला महोत्सवाचे आयोजन करून लोककलेला नवसंजीवनी दिली आहे. जिल्ह्यात कोणतीही सुविधा नसतांना गेल्या ५० वर्षांपासून सोंगाड्या या लोककलेची परंपरा आम्ही जोपासत आहोत. या महोत्सवाच्या माध्यमातून तरुण पिढीला लोककलेविषयी रुची वाढेल, असे मत ज्येष्ठ लोककलावंत तथा सोंगाड्याकार रायसिंग पाडवी यांनी व्यक्त केले. राजीव तुलालवार यांनी शिक्षण हा मुलांचा अधिकार तर रंगभूमी व रंगमंच मुलांची गरज आहे. यासाठी बालरंगभूमी परिषदेची स्थापना झाल्याचे सांगितले. बालरंगभूमी परिषदेच्या राज्य अध्यक्षा ॲड. नीलम शिर्के-सामंत यांची लोककला महोत्सवाची भूमिका विषद केली.

महोत्सवाचा निकाल असा एकल वाद्य - सर्वोत्कृष्ट - शुभम निर्मल, उत्कृष्ट - मोहित वारूडे, एकल गीत- सर्वोत्कृष्ट - अपूर्व माळी, उत्कृष्ट - रुपेश सोनवणे, एकल नृत्य -सर्वोत्कृष्ट - भाविका पाटील, उत्कृष्ट - लतिका चौधरी, समूह गीत- सर्वोत्कृष्ट - अहिंसा इंटरनॅशनल स्कुल, नंदुरबार, उत्कृष्ट - ओमकार संगीत साधना, नंदुरबार, उत्तम - एस.ए. मिशन इंग्लिश मीडियम स्कूल, नंदुरबार. समूह नृत्य - सर्वोत्कृष्ट - आदर्श विद्यामंदिर नंदुरबार, उत्कृष्ट - के.डी.गावित इंग्लिश मीडियम स्कूल पथराई, उत्तम - पोदार इंटरनॅशनल स्कूल नंदुरबार यांचा समावेश आहे.

## सागर बंगल्यावरील नेता बदलल्यानंतर नितेश राणेंना कोण वाचविणार?





**हिंगोली :** आगामी दिड महिन्यात सागर बंगल्यावरील नेता बदलून त्या ठिकाणी महाविकास आघाडीचा नेता येणार आहे. त्यावेळी तुम्हाला कोण वाचविणार याचा विचार नितेश राणे यांनी करावा असा सल्ला वजा इशारा राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारी ता. ११ वसमत येथे पत्रकारांशी बोलतांना दिला आहे.

वसमत येथे आयोजित युवा संवाद मेळाव्याच्या कार्यक्रमासाठी आमदार रोहित पवार, रोहित पाटील आले होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. तत्पुर्वी त्यांनी शहरातून दुचाकी रॅली काढली होती.

यावेळी पत्रकारांशी बोलतांना पवार म्हणाले की, मागील पाच वर्षात नितेश राणे यांनी सागर बंगल्यातील नेत्याला खूष करण्यास घालवली. त्यांची सत्ता असतांना देखील त्यांना पद मिळाले नाही. पुढील दिड महिन्यात सागर बंगल्यात महाविकास आघाडीचा नेता बसणार आहे. त्यामुळे काही समाजाच्या विरोधात, महिलांच्या विरोधात वक्तव्य करणाऱ्या नितेश राणे यांना तेव्हा कोण वाचविणार याचा विचार त्यांनी केला पाहिजे.

राज्य सरकारवर टिका करतांना ते म्हणाले की, सरकार निर्णयावर निर्णय घेत आहे, मात्र पुर्वी घेतलेल्या निर्णयाचे काय झाले यावर कोणीच बोलत नाहीत. नुकत्याच झालेल्या कॅबीनेटच्या बैठकीत अडीच तास चर्चा झाली. राज्य सरकारचा भ्रष्टाचार सुरुच राहिला तर जानेवारी महिन्यात अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी पैसा राहणार नाही. सरकारने मागील अडीच वर्षात शेतकरी, कष्टकऱ्यांसाठी कोणत्याच चांगल्या् योजना आणल्या नाही उलट आता जनतेचाच पैसा जनतेत वाटण्याचे काम सरकार करीत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

आगामी विधानसभा निवडणुकीनंतर मुख्यमंत्री कोण राहिल यावर बोलतांना पवार म्हणाले की, राज्यातील जनतेचा विचार करणारा महाविकास आघाडीचा मुख्यमंत्री असेल. मात्र मुख्ममंत्री कोण असणार हे काँग्रेसचे नेते राहुल गांधी, राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, शिवसेनेचे पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे हेच ठरवितील. त्यामुळे कोणी कितीही मत व्यक्त केले तरी नेतेच निर्णय घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## आंतर महाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धेत मा. प. विधी. महाविद्यालय द्वितीय



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने आयोजित आंतर महाविद्यालयीन व्हॉली बॉल स्पर्धेत माणीकचंद पहाडे विधी महाविद्यलयाच्या महिला संघाने उपविजेते पद मिळविले.

या संघात अलगुज देशमुख, वनिता मोरे, गंगा येंडे, पूजा पवार, साक्षी मोरे, श्रृती सोनवणे, श्रृती कोकरे, मयुरी इंगोले, कमोज बैरागी, साक्षी डोईफोडे यांचा सहभाग होता. विद्यार्थीनींच्या या यशाबद्दल महाविद्यलयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. सी. एम. राव यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## शांततेचा नोबेल पुरस्कार मिळवणारी जपानची निहॉन हिडानक्यो संस्था

नोबेल पुरस्कार समितीने २०२४ साठीच्या नोबेल शांतता पुरस्कारांची घोषणा केली आहे. जपानमधील निहॉन हिडानक्यो या संस्थेला हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

दुसऱ्या महायुद्धामध्ये हिरोशिमा आणि नागासाकी या जपानच्या दोन शहरांवर अणूबॉम्बने हल्ला झाला होता. या हल्ल्यामध्ये शेकडो लोक मृत्यूमुखी पडले होते.

या अण्वस्त्र हल्ल्यातून बचावलेल्या लोकांसाठी ही संस्था काम करते. या चळवळीला 'हिबाकुशा' असं नाव दिलं गेलं आहे.

या चळवळीच्या माध्यमातून संपूर्ण जग आण्विक हल्ल्यांपासून मुक्त करणे आणि अशी अण्वस्त्रं कधीच वापरली जाऊ नयेत, असा प्रयत्न करणं हे या चळवळीचं उद्दिष्ट होतं.

ऑगस्ट १९४५ मध्ये झालेल्या हल्ल्यानंतर एक जागतिक चळवळ उभी राहिली होती. या हल्ल्यामुळे जे मानवी संकट उभं राहिलं होतं त्याबद्दल अथक जागृती करण्याचं काम या चळवळीच्या माध्यमातून करण्यात आलं.

त्यातून एक नवा पायंडा घालून देण्यात आला. आण्विक शस्त्रं वापरणं हे नैतिकदृष्ट्या अस्वीकारार्ह आहे, तो एक प्रकारचा कलंक आहे असं वातावरण तयार करण्यात या चळवळीला यश प्राप्त झालं. त्यालाच 'न्यूक्लिअर टॅबू' असंही म्हणतात.

हिबाकुशा चळवळीनं केलेलं काम हे निव्वळ हिरोशिमा आणि नागासाकीमधून बचावलेल्या लोकांसाठीचं नव्हे तर व्यापक पातळीवर बदल घडवण्याच्या दृष्टीनंही महत्त्वाचं आहे.

या चळवळीमुळं अण्वस्त्रांविरोधात मोठ्या प्रमाणावर विरोधी जनमत तयार होण्यास मदत झाली. अण्वस्त्रांना बळी पडलेल्या लोकांनी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात सहन केलेल्या वेदनांच्या गोष्टींचीही त्यात मदत झाली.

त्यांनी अनुभव लोकांमसमोर मांडणारे आणि त्याद्वारे जनजागृती करणारे उपक्रम राबवले. आण्विक शस्त्र आणि त्यांच्या वापराविरोधातील आवाज अधिकाधिक वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला.

हा पुरस्कार देताना नोबेल पुरस्कार समितीनं एक महत्त्वाची बाब अधोरेखित केली. गेल्या ८० वर्षांत कोणत्याही युद्धात आण्विक शस्त्रांचा वापर झालेला नाही.

निहॉन हिडानक्यो आणि हिबाकुशा चळवळीच्या अथक प्रयत्नांमुळे आण्विक शस्त्र वापरणं हा एक प्रकारचा कलंक (टॅबू) आहे, ही बाब जागतिक पातळीवर प्रस्थापित करण्यास मदत झाली.

१९५६ मध्ये या संस्थेची स्थापना झाली होती. संस्थेनं त्यांच्या वेबसाइटवर दिलेल्या माहितीनुसार, ही संस्था आण्विक शस्त्र वापरल्यामुळे एखाद्या व्यक्तीचे किंवा कुटुंबाचे किती नुकसान झाले आहे याची माहिती पाठवण्याचं आवाहन जगभरातील लोकांना करत असते.

हिरोशिमा आणि नागासाकीमध्ये अण्वस्त्रांमुळे प्रचंड विध्वंस झाल्यावर दहा वर्षांनी या कामाला सुरुवात झाली.

६ ऑगस्ट १९४५ ला अमेरिकेने हिरोशिमावर युरेनियम बॉम्ब टाकला होता. त्यामध्ये जवळपास १ लाख ४० हजार लोकांचा मृत्यू झाला होता.

या विध्वंसाच्या तीनच दिवसांनंतर ९ ऑगस्टला नागासाकी या शहरावरही बॉम्ब टाकण्यात आला. या भीषण हल्ल्यांनंतर दुसऱ्या महायुद्धात जपानने शरणागती पत्करली होती आणि दुसरं महायुद्ध संपलं.

एएफपी या वृत्तसंस्थेनं दिलेल्या माहितीनुसार, जपानमधील माध्यमांशी बोलताना या संस्थेचे सहप्रमुख तॉशियुकी मिमाकी म्हणाले, "आम्हाला हा पुरस्कार मिळेल याची आम्ही कधी कल्पनाही केली नव्हती." हे बोलताना त्यांना अश्रू आवरले नाहीत.

संयुक्त राष्ट्रांच्या UNWRA या पॅलेस्टाईनच्या बाजूने असलेल्या संस्थेला यावर्षीचा नोबेल शांतता पुरस्कार मिळेल असा अंदाज व्यक्त केला जात होता.

गाझामध्ये जीवनावश्यक वस्तू पोहोचवण्याचं काम मुख्यत्वे हीच संस्था करत आहे. मात्र, हमासने इस्रायलवर ७ ऑक्टोबरला केलेल्या हल्ल्यात या संस्थेतील नऊ सदस्यांचा सहभाग असल्याचा आरोप होता. त्यानंतर या सदस्यांची हकालपट्टी करण्यात आली होती.

या संस्थेला नोबेल पुरस्कार मिळू नये, यासाठी १२,००० लोकांनी सही करून एक याचिका नोबेल पुरस्कार समितीला दिली होती.

'इंटरनॅशनल कोर्ट ऑफ जस्टिस'च्या नामांकनाबद्दलही अशाच शंका व्यक्त करण्यात येत होत्या.

इस्रायलने गाझामध्ये नरसंहार केला आहे अशी एक याचिका संयुक्त राष्ट्रांची ही मुख्य न्यायसंस्था असलेल्या आयसीजेकडे आहे. त्यांनी इस्रायलला नरसंहारसदृश्य कृत्य न करण्याची विनंती केली आहे.

नोबेल इन्स्टिट्यूटने दिलेल्या माहितीनुसार, या वर्षीच्या शांतता पुरस्कारासाठी २८६ नामांकनं आली होती. त्यात १९७ व्यक्ती आणि ८९ संस्थांचा समावेश होता.

उच्चपदावर असलेल्या व्यक्ती, संसद सदस्य, सरकारं आणि आंतरराष्ट्रीय न्यायालये यांच्याकडून व्यक्ती आणि संस्थांना नामांकित करण्यात येऊ शकतं.

गेल्या वर्षी इराणच्या मानवी हक्क कार्यकर्त्या नर्गिस मोहम्मदी यांना नोबेल शांतता पुरस्कार मिळाला होता. स्त्रियांच्या छळाविरुद्ध दिलेल्या लढ्याचा गौरव म्हणून त्यांना हा पुरस्कार देण्यात आला होता.